# Maharashtra Board Class 10 Sanskrit Anand Notes Chapter 7 वाचनप्रशंसा

## वाचनप्रशंसा Summary in Marathi

प्रस्तावना :

क्षेपणास्त्रक्षेत्राच्या विकासकार्यातील योगदानामुळे सन्मानननीय डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना ‘इंडियाज मिसाईलमॅन’ असे संबोधित करण्यात आले. तसेच तरुणवर्ग व लोकांना प्रगतीपथावर जाण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करणाऱ्या या राष्ट्रपतींना ‘पिपल्स प्रेसिडण्ट’ (लोकांचे राष्ट्रपती) हा किताबही देण्यात आला होता.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी पुस्तकांना आजन्म सोबती मानले. त्यांनी म्हटले आहे, “चांगल्या पुस्तकाच्या संपर्कात येणे व त्याला बाळगणे ही चिरस्थायी संपन्नता आहे.” ते पुस्तकांचा आदर करायचे. म्हणूनच, त्यांची जन्मतिथी, 15 ऑक्टोबर हा ‘वाचनप्रेरणा दिवस’ म्हणून पाळला जातो. वाचनप्रशंसा हे पद्य, वैविध्यपूर्ण पुस्तकांच्या वाचनामुळे होणाऱ्या लाभावर प्रकाश टाकते.

श्लोकः 1

शीलं सद्गुणसम्पत्तिः ज्ञानं विज्ञानमेव च।
उत्साहो वर्धते येन वाचनं तद् हितावहम् ।।1।।

अनुवादः

ते वाचन हितावह आहे, ज्यामुळे मनुष्याचे चारित्र्य, सद्गुणरूपी संपत्ती, ज्ञान, विशेष आकलन व उत्साह (यांचे) संवर्धन होते.

श्लोक: 2

मनुजा वाचनेनैव बोधन्ते विषयान् बहून्।
दक्षा भवन्ति कार्येषु वाचनेन बहुश्रुताः।।2।।

अनुवादः

केवळ वाचनाने लोकांना अनेक विषयांचे आकलन होते. (लोक) वाचनामुळे (त्यांच्या) कार्यात दक्ष व सुविद्य होतात.

श्लोक: 3

वाल्मीकिव्यासबाणाद्याः प्राचीनाः कविपण्डिताः।
तान् शिक्षयन्ति सततं ये सदा वाचने रताः।।3।।
अन्वय:- ये सदा वाचने रताः तान् वाल्मीकि-व्यास-बाणाद्याः प्राचीनाः कविपण्डिताः शिक्षयन्ति।

अनुवादः

जे नेहमी वाचनामध्ये मग्न असतात, त्यांना, वाल्मीकि, व्यास, बाण इ. कवी व विद्वान (त्यांच्या लिखाणातून) नेहमी शिकवितात. (या कवींचे साहित्य वाचल्यास वाचकांचा भ्रम दूर होऊन ते ज्ञानी बनतात.)

श्लोकः 4

अद्ययावद्धि ज्ञानाय वृत्तपत्रं पठेत्सदा।
सर्वविधसुविद्यार्थ वाचनमुपकारकम्।।4।।

अनुवादः

मनुष्याने अद्ययावत ज्ञान (माहिती) मिळण्यासाठी नेहमी वर्तमानपत्र वाचावे. वाचन हे सर्व प्रकारचे ज्ञान मिळविण्यासाठी (अतिशय) उपयुक्त आहे.

श्लोकः 5

वथाभ्रमणकुक्क्रीडापरपीडापभाषणैः।
कालक्षेपो न कर्तव्यो विद्यार्थी वाचनं श्रयेत्।।5।।

अनुवादः

विद्यार्थ्यांनी दिशाहीन भटकण्यात, अपायकारक क्रीडा खेळण्यात, इतरांना क्लेश (त्रास) देण्यात, (व) (इतरांना) बोल लावण्यात (दोष देण्यात) वेळ वाया घालवू नये. विद्यार्थ्याने वाचनाचा आश्रय घ्यावा. (वाचनात अधिकाधिक मग्न असावे) स्पष्टीकरण – वाचनाने माणसाचे चारित्र्य समृद्ध होते, याउलट, विद्यार्थी श्लोकात उद्‌धृत केलेल्या वायफळ कृतींमध्ये मग्न असल्यास, त्याचा वेळ तर वाया जातोच व त्याचे मनही कलुषित होते.

श्लोकः 6

वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम्।
वार्धक्ये दुःखहरणं हितं सद्ग्रन्थवाचनम्।।6।।
अन्वयः- वाचनं बाल्ये ज्ञानदं, तारुण्ये शीलरक्षकम्, वार्धक्ये दुःखहरणं (भवति) (अत:) सद्ग्रन्थवाचनं हितं (भवति)।

अनुवादः

वाचन लहानपणात ज्ञान देणारे, तरुणपणी चारित्र्याचे संरक्षण करणारे, (व) म्हातारपणात दुःख दूर करणारे आहे. (म्हणून) चांगल्या पुस्तकांचे वाचन हितावह असते.

सन्धिविग्रहः

1. विज्ञानमेव – विज्ञानम् + एव।
2. उत्साहो वर्धते . उत्साहः + वर्धते।
3. दक्षा भवन्ति – दक्षा: + भवन्ति ।
4. पठेत्सदा – पठेत् + सदा।
5. कालक्षेपो न – कालक्षेप: + न ।
6. कर्तव्यो विद्यार्थी – कर्तव्यः + विद्यार्थी।
7. वाचनमुपकारकम् – वाचनम् + उपकारकम्।

https://www.evidyarthi.in/

शब्दार्थाः

1. उत्साहः – enthusiasm – उत्साह
2. सम्पत्तिः – treasure/wealth – संपन्नता
3. शीलम् – character – चारित्र्य
4. विज्ञानम् – comprehension, wisdom – विशेष आकलन, शहाणपणा
5. हितावहम् – beneficial – हितकारक
6. वर्धते – increases – वाढते
7. पण्डिताः – scholars – विद्वान
8. प्राचीनाः – ancient – प्राचीन
9. रताः – engrossed – मग्न
10. शिकवितात – teach /educate – शिक्षयन्ति
11. सर्वविध – of all sorts – सर्व प्रकारच्या
12. वृत्तपत्रम् – newspaper – वर्तमानपत्र
13. उपकारकम् – useful / helpful – उपयोगी / उपयुक्त
14. अद्ययावत् – updated – अद्ययावत
15. सुविद्यार्थम् – for good learning – ज्ञानासाठी
16. वृथाभ्रमण – aimless wandering – दिशाहीन भटकणे
17. अपभाषण – abusive talk – चुकीचे बोलणे
18. कुक्रीडा – harmful game – अपायकारक खेळ
19. परपीडा – troubling others – इतरांना त्रास देणे
20. कालक्षेप:न – should not waste – वेळ वाया घालवू नये
21. कर्तव्यः – time
22. श्रयेत् – one should resort to – आश्रय घ्यावा (अवलंब करावा)
23. ज्ञानदम् – gives knowledge – ज्ञान देणारे
24. शीलरक्षकम् – guards the character – चारित्र्याचे संरक्षण करणारे
25. बाल्ये – in the childhood – लहानपणी
26. तारुण्ये – in the youth – तरुणपणात
27. वार्धक्ये – in the old age – म्हातारपणी
28. दुःखहरणं भवति – wards off sorrow – दुःख दूर करते
29. दक्षाः – prompt / alert – दक्ष, सावध
30. बोधन्ते – understand – आकलन होते
31. बहुश्रुताः – well-versed/ knowledgeable – सुविद्य